नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३९ Issue - 139 | वार मंगळवार दि. ७ ऑक्टोबर २०२५ Blow- Wednesday Date 7 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यातील नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर

१४७ नगर पंचायती आणि २४७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षांसाठी आरक्षण सोडत जाहीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत आज नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली. राज्यातील २४७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत आज काढण्यात आली. यामध्ये ३३ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जाती, ११ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्गाचे नगराध्यक्ष ६७ नगरपालिकांमध्ये असतील. तर खुल्या प्रवर्गाचे नगराध्यक्ष १३६ नगरपालिकांमध्ये असतील. आज जाहीर झालेल्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणामुळं निवडणूक प्रक्रियेला आता वेग येणार आहे.

प्रवर्गनिहाय नगराध्यक्ष आरक्षणाची यादी

अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीवः- ३३ नगरपालिका

घुग्घुस (महिला), पांचगणी, अकलूज (महिला) ओझर (महिला) शिर्डी (महिला) डिगडोह (देवी) (महिला) तेल्हारा (महिला) शिरोळ (महिला) मोहोळ (महिला) भुसावळ (महिला) फुरसुंगी ऊरुळी-देवाची वानाडोंगरी (महिला) , हुपरी, शेगांव, लोणावळा, बुटीबोरी, आरमोरी मलकापूर, जि. सातारा नागभिड बीड (महिला) चिमूर (महिला) चांदवड, देऊळगांवराजा (महिला) कळमेश्वर, परतूर (महिला) मैंदर्गी (महिला) अंजनगांवसूर्जी दिग्रस (महिला) आर्णी सेलू सावदा (महिला) गडहिंग्लज जळगांव जामोद

अनुसुचित जमाती या प्रवर्गासाठी राखीवः- ११ नगरपालिका

पिंपळनेर (महिला) पिंपळगांव-बसवंत, भडगांव (महिला) यवतमाळ (महिला) वरुड वणी (महिला) शेंदूरजनाघाट (महिला) राहुरी, एरंडोल, अमळनेर, उमरी (महिला)

नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) : ६७ नगरपालिका

तिरोडा,वाशिम, धामणगांवरेल्वे (महिला) भोकरदन (महिला) भद्रावती, परांडा, भगूर (महिला) मालवण (महिला) नंदुरबार खापा, वरोरा (महिला) हिंगोली (महिला) मोर्शी (महिला) शहादा, उमरेड (महिला) नवापूर, त्र्यंबक, कोपरगांव, हिवरखेड (महिला) बाळापूर (महिला) शिरुर (महिला) कुळगांव-बदलापूर (महिला) मंगरुळपीर कन्हान-पिंपरी, पाथर्डी देगलूर (महिला) नेर-नबाबपूर (महिला) धाराशिव (महिला) इगतपुरी (महिला), रामटेक, माजलगांव (महिला) ,नशिराबाद, पालघर, मुल (महिला), वरणगांव, बल्लारपूर (महिला), मलकापूर, जि. बुलडाणा, इस्लामपूर, जुन्नर (महिला), कुर्डूवाडी (महिला), मोहपा, तुमसर, औसा (महिला) महाड, मुरुड-जंजिरा (महिला) अकोट (महिला) राहता, श्रीवर्धन, विटा (महिला) ब्रम्हपूरी,दर्यापूर चोपडा (महिला) वैजापूर सटाणा (महिला) काटोल (महिला) गोंदिया सांगोला दौंड (महिला) रोहा (महिला) वर्धा देसाईगंज (महिला) येवला पुलगांव (महिला) कर्जत, जि. रायगड (महिला) दोंडाईचा-वरवाडे (महिला) कंधार शिरपूर-वरवाडे

खुला प्रवर्ग राखीव :१३६ नगरपालिका

परळी-वैजनाथ (महिला) मुखेड (महिला) अंबरनाथ (महिला) अचलपूर (महिला) मुदखेड (महिला) पवणी (महिला) कन्नड (महिला) मलकापूर, जि. कोल्हापूर (महिला) मोवाड (महिला) पंढरपूर (महिला) खामगांव (महिला) गंगाखेड (महिला) धरणगांव (महिला) बार्शी (महिला) अंबड (महिला) गेवराई (महिला) म्हसवड (महिला) गडचिरोली (महिला) भंडारा (महिला) उरण (महिला) बुलडाणा (महिला) पैठण (महिला) कारंजा (महिला) नांदुरा (महिला) सावनेर (महिला) मंगळवेढा (महिला) कळमनूरी (महिला) आर्वी (महिला) किनवट (महिला) कागल (महिला) संगमनेर (महिला) मुरगुड (महिला) साकोली (महिला) कुरुंदवाड (महिला) पुर्णा (महिला) कळंब (महिला) चांदुरेल्वे (महिला) चांदुरबाजार (महिला) भुम (महिला) रत्नागिरी (महिला) रहिमतपूर (महिला) खेड (महिला) करमाळा (महिला) वसमत (महिला) हिंगणघाट (महिला) रावेर (महिला) जामनेर (महिला) पलुस (महिला) यावल (महिला) सावंतवाडी (महिला) जव्हार (महिला) तासगांव (महिला) राजापूर (महिला) सिंधखेरेल्वे (महिला) जामखेड (महिला) चाकण (महिला) शेवगांव (महिला) लोणार (महिला) हदगांव (महिला) पन्हाळा (महिला) धर्माबाद (महिला) उमरखेड (महिला) मानवत (महिला) पाचोरा (महिला) पेण (महिला) फैजपूर (महिला) उदगीर (महिला) अलीबाग (महिला) फलटण, अहमदपूर, पाथरी, चाळीसगांव, तळोदा, वाई ,नांदगांव ,जयसिंगपूर, निलंगा, लोहा, खोपोली, राजगुरूनगर, कराड, जेजुरी,उमरगा आळंदी पुसद बाराती जत पारोळा तळेगांव-दाभाडे सासवड गडचांदुर रिसोड वेंगुर्ला पातूर किल्लेधारुर चिखली मेहकर दारव्हा सिल्लोड सिन्नर देवळी मुरूम वडगांव महाबळेश्वर आष्टा दुधणी कुंडलवाडी खुलताबाद नरखेड राजूर सिंदखेडराजा वाडी डहाणू देवळाली प्रवरा कामठी अक्कलकोट सातारा भोर इंदापूर चिपळून माथेरान श्रीगोंदा श्रीरामपूर मनमाड नळदुर्ग भोकर बिलोली अंबेजोगाई जिंतूर सोनपेठ गंगापूर पांढरकवडा घाटंजी मुर्तीजापूर चिखलदरा तुळजापूर

कोल्ड्रिप सिरपच्या खराब आणि धोकादायक उत्पादनांवर प्रतिबंध : आबिटकर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतातील अनेक राज्यांमध्ये लहान मुलांसाठी धोकादायक ठरलेल्या कोल्ड्रिप कफ सिरपवर केंद्र आणि राज्यांनी तातडीने बंदी घालण्यास सुरुवात केली आहे. मध्यप्रदेश-राजस्थाननंतर महाराष्ट्रामध्ये देखील या औषधाविरोधात कठोर कारवाई सुरु आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापुरात माध्यमांशी बोलताना खुलासा केला की, केंद्र सरकारच्या सुचनांनुसार कोल्ड्रिप सिरपच्या खराब आणि धोकादायक उत्पादनांवर प्रतिबंध घालण्याचं काम राज्य आरोग्य विभागाने आखले आहे.

काही कंपन्यांचे उत्पादन चुकीचं असल्याने सर्व सिरपवर संशय घेण्याचा आधार नाही. त्यामुळे केंद्राकडून आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करत आहोत. काल केंद्रासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग झाली असून, त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या औषध नियंत्रण यंत्रणेने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता गोष्टींचे गांभीर्य समजून काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं.

मध्यप्रदेश, राजस्थान आणि तमिळनाडूमध्ये कोल्ड्रिफ सिरपच्या वापरामुळे अनेक लहान मुलांच्या मृत्यूची घटना उघडकीस आल्यामुळे या उत्पादनावर प्रतिबंध लागू झाला आहे. महाराष्ट्रातही श्रीसन फार्मा कांचीपुरम येथे तयार होणाऱ्या विशेष बॅच डठ-१३ च्या विक्रीवर विशेष बंदी घालण्यात आली आहे. या बॅचमध्ये हानिकारक घटक डायथिलीन ग्लायकॉल (अएक्र) आढळल्याची तमिळनाडू सरकारच्या तपासणीत नोंद झाली आहे, अशी माहिती आरोग्य मंत्र्यांनी दिली.

बिहारच्या निवडणुका दोन टप्प्यात, ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान, तर १४ नोव्हेंबर रोजी निकाल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : अवघ्या देशाचे लक्ष लागून असलेल्या बिहार निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाचे (एश्रशलींळेप उेाळीळेप) प्रमुख ज्ञानेश कुमार यांनी बिहारच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. बिहारच्या निवडणुका या दोन टप्प्यात होणार आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान हे ६ नोव्हेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान हे ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या निवडणुकीचा निकाल १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

पहिल्या टप्प्यातील निवडणूक ही ६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १० ऑक्टोबर आणि १३ ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.

बिहार निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही १७ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २० ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल.

अर्जांची छाननी ही १८ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २१ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) रोजी होणार.

अर्ज मागे घेण्याची मुदत ही २० ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २३ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल.

मतदान - पहिला टप्पा - ६ नोव्हेबर

दुसरा टप्पा - ११ नोव्हेंबर

निवडणुकीचा निकाल - १४ नोव्हेंबर

बिहारमध्ये आम्ही सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. त्याचसोबत सर्व निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी आणि इतर सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, यावेळी बिहारच्या निवडणुका सुरळीत आणि सोप्या पद्धतीने होतील. निवडणुकीसाठी आम्ही बिहारच्या जनतेचे सहकार्य अपेक्षित करतो. बिहारमध्ये एकूण ७ कोटी ४२ लाख मतदार आहेत. त्यापैकी ३ कोटी ९२ लाख पुरुष आणि ३ कोटी ५० लाख महिला मतदार आहेत. १४ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करतील. प्रत्येक मतदान केंद्रावर १,२०० मतदार असतील. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, मतदानाच्या १० दिवस आधीपर्यंत नावे नोंदवता येतील. एसआयआरच्या माध्यमातून अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात आली. निवडणुकीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. निवडणुकीच्या काळातील फेक न्यूजवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा ज्ञानेश कुमार यांनी दिला. सर्व मतदान केंद्रांवर हिंसाचारावर शून्य सहनशीलतेचे (नशी ढेश्रशीरपलश) निर्देश देण्यात आले आहेत. सर्व अधिकारी निष्पक्षपणे काम करतील.

वृद्ध मतदारांसाठी रॅम्प आणि व्हीलचेअर उपलब्ध असतील. सर्व मतदान केंद्रांवरील निवडणूक प्रक्रिया थेट प्रक्षेपित केली जाईल अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली.

सुनावणीप्रसंगी सरन्यायाधिशांवर हल्ल्याचा प्रयत्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : एका वकिलाने घोषणाबाजी करून देशाचे सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठावर बूट फेकण्याचा प्रयत्न केल्याने सर्वोच्च न्यायालय हादरले. सीजेआय गवई यांनी हल्ल्याच्या प्रयत्नानंतर पहिली प्रतिक्रिया देत म्हणाले की अशा गोष्टींचा माझ्यावर परिणाम होत नाही. बार अँड बेंचच्या अहवालानुसार, ही घटना घडली तेव्हा गवई खंडपीठासमोर खटल्यांचा उल्लेख करत होते. सूत्रांच्या हवाल्याने अहवालात म्हटले आहे की एका वकिलाने खंडपीठाच्या व्यासपीठाजवळ जाऊन सरन्यायाधीशांवर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. तथापि, न्यायालयात उपस्थित असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला पकडले आणि बाहेर काढले.

न्यायालयाबाहेर पडताना वकिलाने ओरडून म्हटले की, भारत सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही. तथापि, सीजेआय गवई यांनी घटनेकडे लक्ष दिले नाही आणि वकिलांना त्यांचे युक्तिवाद सुरू ठेवण्यास सांगितले. त्यांनी वकिलांना सांगितले की, या सर्व गोष्टींमुळे विचलित होण्याची गरज नाही. आपण याने विचलित होत नाही. अशा गोष्टींचा माझ्यावर परिणाम होत नाही.

काही प्रत्यक्षदर्शी म्हणतात की वकिलाने बूट काढण्याचा प्रयत्न केला, तर काही जण म्हणतात की बूट काढण्याऐवजी तो कागदाचा तुकडा हलवून विधान करण्याचा प्रयत्न करत होता. ही घटना खजुराहो येथील भगवान विष्णूच्या तुटलेल्या मूर्तीच्या जीर्णोद्धाराशी संबंधित खटल्यात सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी केलेल्या टिप्पण्यांशी जोडली जात आहे. १६ सप्टेंबर रोजी, सरन्यायाधीश गवई यांनी खटल्याची सुनावणी घेण्यास नकार दिला, असे म्हटले की हे प्रकरण भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या अधिकारक्षेत्रात आहे आणि म्हणून न्यायालय हस्तक्षेप करणार नाही.

या प्रकरणात सरन्यायाधीश गवई यांनीही एक टिप्पणी केली ज्यामुळे बराच वाद निर्माण झाला. त्यांनी विनोदाने याचिकाकर्त्याला सांगितले की, तुम्ही म्हणता की तुम्ही भगवान विष्णूचे महान भक्त आहात. तुम्ही त्यांना काहीतरी करण्याची प्रार्थना करावी. सरन्यायाधीश गवई यांच्या या टिप्पणीमुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात विरोध झाला. लोकांनी सरन्यायाधीशांवर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप केला. सरन्यायाधीश गवई यांनी नंतर खुल्या न्यायालयात हे स्पष्ट केले, त्यांनी म्हटले की त्यांचा कोणाचाही अनादर करण्याचा कोणताही हेतू नव्हता आणि ते सर्व धर्मांचा आदर करतात.

महाराष्ट्र गट-क सेवेची पूर्व परीक्षा ४ जानेवारी २०२६ दिवशी होणार | आजपासून सुरु होणार अर्जप्रक्रिया

'एमपीएससी'ची ९३८ जागांसाठी मेगाभरती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. एमपीएससीकडून महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या जाहिरातीद्वारे ९३८ पदांच्या भरतीसाठी पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उद्योग निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक आणि लिपीक टंकलेखक पदाच्या भरतीसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे.

उद्योग निरीक्षक पदाच्या ९ जागा भरल्या जाणार आहेत. तांत्रिक सहायक पदाच्या ४ जागा, कर सहायक ७३ जागा आणि लिपिक टंकलेखक पदाच्या ८५२ जागांसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे.

महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुरुवात ७ ऑक्टोबरला दुपारी १ वाजता होईल. तर, अर्ज सादर करण्याचा अखेरचा दिनांक २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत असेल. ऑनलाईन शुल्क देखील २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत स्वीकारलं जाणार आहे. तर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत चलनाद्वारे शुल्क भरणार असल्यास ते २९ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत घेता येईल. त्यानंतर ३० ऑक्टोबरला कार्यालयीन वेळेत स्टेट बँकेच्या शाखेत चलन भरावं लागणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट क सेवा परीक्षेला अर्ज करणारा उमेदवार भारतीय असणं आवश्यक आहे. उद्योग निरीक्षक, गट-क संवर्ग वगळता इतर संवर्गासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता उमेदवाराकडे असणं आवश्यक आहे. उद्योग निरीक्षक पदासाठी उमेदवाराकडे सांविधिक विदयापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी असणं गरजेचं आहे.

महाराष्ट्र गट क सेवा परीक्षा दोन टप्प्यात पार पडणार आहे. संयुक्त पूर्व परीक्षा आणि त्यानंतर मुख्य परीक्षा घेतली जाईल. पूर्व परीक्षा १०० गुणांसाठी असेल तर संयुक्त मुख्य परीक्षा ४०० गुणांची असेल. लिपिक टंकलेखक आणि करसहायक पदासाठी टंकलेखन कौशल्य याचणी द्यावी लागणार आहे.

खुल्या प्रवर्गासाठी ३९४ रुपये पूर्व परीक्षेचं शुल्क असेल. तर मागासवर्गीय, ईडब्ल्यूएस आणि अनाथ प्रवर्गासाठी २९४ रुपये तर माजी सैनिकांसाठी ४४ रुपये शुल्क असेल. मुख्य परीक्षेसाठी ५४४ रुपये खुल्या प्रवर्गासाठी,मागासवर्गीय, ईडब्ल्यूएस आणि अनाथ प्रवर्गासाठी ३४४ रुपये तर माजी सैनिकांसाठी ४४ रुपये परीक्षा शुल्क असेल.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

चिमुकल्यांचा बळी

मध्य प्रदेशातील छिंदवाडा परिसरात नऊ लहान मुलांचे मृत्यू झाले; तसेच राजस्थानमध्येही भरतपूर आणि सिकर भागात असेच प्रकार घडले. या सर्व मुलांमध्ये उलट्या, डायरिया, पोटदुखी आणि मूत्रपिंडात बिघाड अशी लक्षणे दिसून आली. परंतु, प्रारंभी संबंधित यंत्रणांनी त्याकडे लक्ष दिले नाही. विषाणूजन्य ताप किंवा मूत्रपिंडात बिघाड अशी कारणे देण्यात आली. काही प्रकरणांमध्ये शवविच्छेदनही करण्यात आले नाही. औषध कंपन्यांना 'क्लीन चिट' देण्याचाही प्रयत्न करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनाही निलंबित करण्यात आले. अखेरीस या मुलांच्या उत्तरीय तपासणीत घातक 'डायइथिलिन ग्लायकोल'चे अंश आढळून आल्यानंतर या प्रकरणांना वाचा फुटली. तमिळनाडूमध्ये उत्पादन झालेल्या 'कोल्ड्रिप' आणि 'नेक्सट्रॉस डीएस' या औषधांवर आता बंदी घालण्यात आली आहे. देशात गेल्या काही काळात 'जेनेरिक' औषधांचा वापर वाढत आहे; तसेच जगभरातही 'जेनेरिक' औषधांचा सर्वांत मोठा पुरवठादार म्हणून भारताचा लौकिक वाढत आहे. अशा काळात या औषधांचा दर्जा सांभाळणे, त्यासाठी कडक नियम आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि भेसळ रोखण्याची यंत्रणा अधिकाधिक काटेकोर होणे आवश्यक आहे. लहान मुलांमधील सर्दी-खोकल्यावर प्रत्येक वेळी कफ सिरप देण्याची गरज नसते; अनेकांची सर्दी आपोआप बरी होते, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे पालकांनीही लगेच घाबरून न जाता स्वत:हून इलाज करणे किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अशी कोणतीही औषधे मुलांना देणे टाळले पाहिजे. घातक रसायनांचे अधिक प्रमाण असलेल्या खोकल्याच्या औषधांच्या (कफ सिरप) सेवनामुळे मध्य प्रदेश आणि राजस्थानात बाराहून अधिक बालकांचा झालेला मृत्यू, म्हणजे औषध नियामक व्यवस्थेतील त्रुटी, औषध कंपन्या- यंत्रणांमधील साटेलोटे आणि कारवाईतील अक्षम्य विलंब यांनी घेतलेले बळी आहेत. आता या राज्यांमधील सरकारी यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत; तसेच केंद्र सरकारनेही कफ सिरपच्या सेवनाबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

खोणी ग्रामपंचायतीतील एक कोटींचा गैरव्यवहार उघड

ग्रामविकास अधिकारी आर.जे. म्हस्के सेवेतून बडतर्फ

ठाणे जिल्हा परिषदेच्या आदेशानुसार म्हस्के यांच्यावर फौजदारी कारवाईचा आदेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील खोणी ग्राम पंचायतीत तब्बल एक कोटी रुपयेहून अधिक निधीचा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. या गंभीर आर्थिक अपहार प्रकरणात गुंतलेल्या तत्कालीन ग्राम विकास अधिकारी राम जगन्नाथ म्हस्के यांना अखेर सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी म्हस्के यांच्यावर फौजदारी कारवाई व रकमेची वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. जानेवारी २०१६ ते जुलै २०१७ या कालावधीत खोणी ग्रामपंचायतीमध्ये म्हस्के यांनी ग्रामनिधी व १४ व्या वित्त आयोगाच्या निधीचा अपहार, निविदा प्रक्रियेत अनियमितता, खोटे धनादेश काढणे, काही ठराविक ठेकेदारांना मर्जीतून कामे देणे, तसेच ठेकेदाराच्या नावाने धनादेश न देता रोखीने रक्कम काढणे असे गंभीर गैरप्रकार केल्याचा आरोप आहे. या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य शाहनवाज इम्तियाज कुरेशी यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीवरून जिल्हा परिषदेने चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीच्या प्रक्रियेदरम्यान म्हस्के यांनी गैरहजर राहणे, दफ्तर न सादर करणे, चौकशी अधिकाऱ्यांना सहकार्य न करणे असे प्रकार केले. त्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक बेजबाबदारपणा आणि गैरवर्तणूक केल्याचे सिद्ध झाले. कल्याण पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालात म्हस्के यांचा दोष स्पष्टपणे नमूद करण्यात आला. यानंतर ठाणे विधी लेखा कार्यालय आणि कोकण विभागाचे सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी स्वतंत्र लेखापरीक्षण करून अहवाल सादर केला. या अहवालानुसार म्हस्के यांच्यावरील सर्व आरोप सिद्ध झाल्याचे नमूद केले आहे. स्थानिक निधी लेखा परीक्षणानुसार, १४ वा वित्त आयोग निधी रु. १६,७८,४४५/- आणि ग्रामनिधी रु. १०,५५,३०२/- असा मिळून एकूण रु. १,४०,३९,७३८/- इतक्या निधीचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले. या संपूर्ण रकमेबाबत म्हस्के यांना जबाबदार धरण्यात आले आहे. सहाय्यक गट विकास अधिकारी (पंचायत) जि.प. ठाणे यांचे संदर्भ ११ नुसार सादर केलेल्या अहवालात स्थानिक निधी लेखा परिक्षा अहवालात .सन २०१६-२०१७ मधील १४ वा वित्त आयोग रक्कम. रूपये १.१२.९७,९९१/- (रूपये एक कोटी बारा लाख सत्यानऊ हजार नऊशे एक्यांनव) इतका तात्पुरता सशंयित अपहाराची प्रमाणके व उपप्रमाणके पुर्ततेबाबत अभिप्राय नमुद केलेले नाहीत. असे अहवालात नमूद आहे.

भिवंडी पंचायत समितीची कठोर कारवाई

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी या प्रकरणात कठोर निर्णय घेत भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांना रक्कम वसुल करण्याचे, जप्तीची प्रक्रिया राबविण्याचे आणि फौजदारी कारवाई सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच म्हस्के यांच्या विरोधात पुढील कायदेशीर पावले उचलण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे तयार करण्याचे निर्देशही दिले गेले आहेत. या प्रकरणात झालेल्या बडतर्फीच्या निर्णयामुळे संपूर्ण भिवंडी तालुक्यातील पंचायत यंत्रणेत खळबळ उडाली आहे. अनेक ग्राम पंचायतीतील अधिकारी आणि कर्मचारी वर्गात यामुळे जबाबदारीची जाणीव आणि दक्षतेचा इशारा निर्माण झाला आहे. नागरिकांच्या करातून मिळणारा निधी पारदर्शकपणे वापरला जावा आणि ग्रामविकासाच्या कामांत पारदर्शकता राहावी, यासाठी ही कारवाई आदर्श ठरणारी असल्याचे मत स्थानिक ग्राम स्थांनी व्यक्त केले आहे. ठाणे जिल्हा परिषदेने या प्रकरणातील निधी वसुली बाबतची कार्यवाही लवकर पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. म्हस्के यांच्याकडून रकमेची वसुली न झाल्यास त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनिक सूत्रांनी सांगितले. या प्रकरणामुळे पंचायत प्रशासनात प्रामाणिकतेचे आणि पारदर्शकतेचे नवीन निकष निर्माण होतील, अशी अपेक्षा जिल्हा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलन उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर व ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग - सामूहिक चिंतन महाप्रकल्प, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलन हा भव्य कार्यक्रम ४ व ५ ऑक्टोबर रोजी पंढरपूर येथे अत्यंत उत्साहात व यशस्वीपणे पार पडला.संमेलनाचे उद्घाटन मा. ना. श्री. जयकुमार कमल गोरे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच पालकमंत्री, सोलापूर जिल्हा यांच्या शुभहस्ते झाले. या वेळी श्री. गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज (औसेकर) यांनी स्वागतपर भाषण केले, तर आचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी भूमिका मांडली आणि ह. भ. प. श्री. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांनी बीजभाषण केले. ज्ञानेश्वरीतील श्री निवृत्ती-ज्ञानदेव संवाद या सत्रात ह. भ. प. श्री. भागवत महाराज साळुंके यांनी रसपूर्ण विवेचन केले.तसेच श्रीमद् भगवत ज्ञानेश्वरीतील पात्रांचा तौलनिक विचार या विषयावर ह. भ. प. श्री. चैतन्य महाराज देगलूरकर यांचे भाषण प्रभावी ठरले, तर अमृतानुभव विषयावर ह. भ. प.श्री.जयवंत महाराज बोधले यांनी मनोवेधक विवेचन केले.श्री ज्ञानदेव, ज्ञानदेवी आणि भाषा व्यवहार या विषयावर श्री.अभय टिळक यांनी आपले विचार व्यक्त केले.संतपूजनाचा कार्यक्रम डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे व डॉ. दिलीप धनेश्वर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी मान्यवर महाराज मंडळी उपस्थित होते.कार्यक्रमाचा समारोप संतपूजन, सामूहिक पसायदान व आभार प्रदर्शनाने झाला.संमेलन समन्वयक ह. भ. प. श्री. उमेश बागडे यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सहकार्य केले.यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ड. माधवी निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत तसेच अनेक मान्यवर वारकरी व भाविक यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रम पार पडला.कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सर्वांचे आभार मानले. या राज्यस्तरीय संमेलनात विविध विद्यापीठांतील अभ्यासक, संत साहित्यप्रेमी व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. श्री ज्ञानदेवांच्या विचारधारेचा अभ्यास, चिंतन व प्रसार साध्य करण्याच्या दिशेने हे संमेलन एक प्रेरणादायी पाऊल ठरले.

एकनाथ शिंदे यांची ओएसडी मंगेश चिवटे यांच्या भावावर प्राणघातक हल्ला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची ओसीडी मंगेश चिवटे च्या भावांवर करमाळ्यात प्राण घातक हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून शिवसेनेतील अंतर्गत मंडळीला हिशोबळांना लागलेली चर्चा आता राजकीय वर्तुळातून सुरू आहे. दिवे बागल आणि रेशमी बागल यांनी सुपारी देऊन हा हल्ला केल्याचा आरोप मंगेश चिवटे यांनी केला आहे. माजी मंत्री स्वर्गीय दिगंबर व बागल यांचे दिग्विजय पुत्र असून नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिग्विजय बागल हे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून उमेदवारी म्हणून रिंगणात होते. तर त्यांची बहीण रश्मी बागल कोलते या भाजपच्या महिला आघाडीच्या प्रमुख आहेत काही दिवसापूर्वी धमकी दिल्या प्रकरणी दिग्विजय बागल यांच्या विरोधात महेश चिवटे यांनी पोलिसात तक्रार केली होती. त्यानंतर आज त्यांच्यावर प्राणघाटन खाल्ला झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार महेश चिवटे हे करमाळा तालुक्यातील शिवरवाडी येथे सकाळी शेतात गेले असता त्यांच्यावर रश्मी बागल आणि दिग्विजय बागल यांनी हल्ला केल्याचा आरोप महेश चिवटे यांनी केला आहे. या घटनेनंतर महेश चिवटे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून झाल्यानंतर पोलीस निरीक्षक रंजीत माने यांनी घटनास्थळी दाखल होऊन सदर घटनेचातपास सुरू केला आहे.

पोलिस निरीक्षक रेखा घनवट यांचा तेज न्यूज परिवाराकडून सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भाळवणी/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील तेज न्यूज परिवाराच्या वतीने पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांच्या सत्कार प्राची प्रशांत माळवदे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पोलीस अधिकारी वीरसेन पाटील यांचा सत्कार संपादक प्रशांत माळवदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पोलीस अधिकारी अजित मिसाळ,सुनील लोंढे,ताटे उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांनी तेज न्यूज विषयी सांगितले की ग्रामीण भागातील न्यूज चॅनेल असून ही नावाप्रमाणेच तेज बातम्या प्रसिद्ध करतात.कायम नवीन बातम्या वाचण्यास मिळतात.तेज न्यूजच्या प्रगतीस आमच्या हार्दिक शुभेच्छा. असे ही घनवट म्हणाल्या.

यावेळी प्रीती माळवदे हिने आभार मानले.

पडघ्यात विविध विकासकामांचे उद्घाटन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्राम पंचायतीच्या विविध विकासकामांचे उद्घाटन नुकतेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. सरपंच रवींद्र विशे यांच्या प्रयत्नातून वाफाळे रोडवरील पंचशीलनगर येथे जनसुविधा योजनेंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ता व ग्रामनिधीतून गटार बांधकाम होणार आहे. याचे भूमिपूजन यावेळी पार पडले. तसेच पंचायत समिती भिवंडी येथून मंजूर झालेले आणि पंचशीलनगरात बसविलेले सौरऊर्जा पथदिवे आणि सरपंच विशे यांच्या वैयक्तिक खर्चातून उभारण्यात येणाऱ्या प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. याचबरोबर मुख्य निधीतून खरेदी करण्यात आलेल्या बाकड्यांचेही वाटप ग्रामस्थांना करण्यात आले. या सोहळ्यात शिवसेना नेते व जिल्हा परिषदेचे सदस्य तसेच पारसिक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश पाटील, उपसरपंच मयुरेश गंधे, ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे, सदस्य शैलेश बिडवी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील, पडघा सोसायटीचे माजी सभापती गुरुनाथ मते, माजी सरपंच शशांक तांबोळी, प्रताप विशे, गुरुनाथ मोरे, अँड. प्रदीप मते, विनोद शेलार, शरद जाधव, उत्तम विशे, प्रदीप गायकवाड, संदीप विशे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सासवडमध्ये उत्साहात साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : डॉ बाबासाहेब आंबेडकर उध्यान,सासवड मध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन अत्यंत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर त्रिशरण, पंचशील, बुद्धपूजा आणि धम्म पालन गाथा घेण्यात आली. वातावरण जयभीमच्या घोषणांनी दुमदुमले होते.

या वेळी पुरंदर-हवेलीचे माजी आमदार संजय जगताप सर यांनी सर्वांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, मी काही वर्षांपूर्वी जपान येथे शिष्टमंडळासोवत गेलो होतो. तिथे दिवसाची सुरुवात असो वा दिवसाचा शेवट, प्रत्येक ठिकाणी 'जयभीम' म्हणतच होतो. जसे आपण इथे 'शुभप्रभात' किंवा 'नमस्कार' म्हणतो तसे तिथे 'जयभीम' हीच संस्कृती आहे. एवढेच नव्हे तर जपानी समाज कधीही भारताकडे पाठ करून झोपत नाही. त्यांचा विश्वास आहे की भारत ही बुद्धांची भूमी आहे. त्यामुळे त्यांना भारताबद्दल अपार आदर आहे.

ते पुढे म्हणाले, जपान आज प्रगतीच्या शिखरावर आहे कारण ते बुद्धांच्या विज्ञाननिष्ठ विचारांवर चालतात. जिथे पिकते तिथे विकले जात नाही, हा

त्यांचा नियम आहे. जर आपण बुद्धांच्या आणि बाबासाहेबांच्या विचारांवर ठाम पणे चाललो, तर भारत महासत्ता होण्यासाठी वेळ लागणार नाही. संविधान हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचले पाहिजे. प्रत्येक गावी वाचनालय उभे केले पाहिजे आणि प्रत्येक घरात संविधानाची प्रत पोहोचली पाहिजे. लोकांना समजेल अशा भाषेत ते समजावून सांगितले गेले पाहिजे. संविधानच लोकशाहीची खरी ताकद आहे.

या वेळी श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष विष्णू दादा भोसले यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्यांनी अनुसूचित जातींमध्ये वर्गवारी करण्याच्या शासनाच्या धोरणाला विरोध दर्शविला. ते म्हणाले, सरकार हे धोरण राबवून समाजात वाद निर्माण करत आहे. आम्ही त्याचा जाहीर निषेध करतो.

बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याबद्दल बोलताना म्हटले, जर बाबासाहेबांच्या विचारांचा सूर्य आमच्या जीवनात उगवला नसता तर

आम्हाला जनावरांपेक्षाही कमी वागणूक मिळाली असती. बाबासाहेबांनी आम्हाला बौद्ध धम्माची दीक्षा देऊन माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.

या सोहळ्यात रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे, पुरंदर तालुका बौद्धजन संघाचे आनंदराव घोरपडे यांनी शुभेच्छा दिल्या. भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस दादासाहेव गायकवाड याच्या मार्गदर्शनाखाली उपासिका संतोली सोनवणे यांनी बासाहेबांनी दिलेल्या बा वीस प्रतिज्ञांचे वाचन केले. पुरंदर शाखेचे बौद्धाचार्य भगवंत सोनवणे यांनी प्रभावी प्रवचन केले.

या कार्यक्रमाला बहुजन हक्क परिषदेचे सचिव कैलास धिवार, ज्येष्ठ पत्रकार हेमंत ताकवले, भारतीय बौद्ध महासभेचे बाळासाहेन पोळ, डी. जी. गायकवाड, राजेंद्र लोंढे, लक्ष्मण लोंढे, सामाजिक कार्यकर्ते सुनील जगताप, अनिल कांबळे, सुधीर शेलार, श्रीधर गायकवाड, डॉ विनायक गायकवाड,भाजपचे युवा नेते तुषार जगताप, पारधी आघाडीचे

पुरुषोत्तम पवार, सामाजिक कार्यकर्ते महादेव तात्या भोंडे, मातंग एकता आंदोलनाचे तालुका अध्यक्ष आप्पासाहेन सकट, सामाजिक कार्यकर्ते संदीप आप्पा भोंडे, शिवसेनेचे राजेंद्र धोत्रे, चर्मकार संघटनेचे मंगेश गायकवाड, बहुजन हक्क परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख अजीम आतार, शिक्षक संघटनेचे योगेश घोरपडे, राज्य बँकेचे अधिकारी योगेश घोरपडे, सामाजिक कार्यकर्ते सुहास बेंगळे, भाजपचे अनिरुद्ध दोडके, भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस दादा गायकवाड, जिल्हा पूर्व संघटक मल्हारी सोनवणे, पुरंदर शाखेचे कोषाध्यक्ष पोपट भोसले, माजी अध्यक्ष कुंडलिक बापू भोसले, पर्यटन सचिव रमेश केदारी, संघटक शिवाजी सोनवणे, जिल्हा पूर्व केंद्रीय कोषाध्यक्ष निलंगी भोसले, सरचिटणीस शालनताई सोनवणे, पर्यटन उपाध्यक्ष सुनीता रोकडे, समता सैनिक दलाचे सचिव शामराव भोसले, रूपाली कांबळे, सुनीता कांबळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू दादा भोसले यांनी केले, तर आभारप्रदर्शन कैलास धिवार यांनी मानले. अखेरीस धम्म पालन गाथेने या कार्यक्रमाची सांगता

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

जिल्ह्यातील पुराने बाधित एकूण ९५ गावांपैकी ८८गावांचा वीज पुरवठा सुरळीत करण्यात 'महावितरण'ला यश

माढा तालुक्यातील वाकाव कुंभेज, खैराव या गावांना मानेगाव उपकेंद्रातून नवीन २२ पोलची ११ केव्ही वाहिनी उभारून वीज पुरवठा सुरळीत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/जिमाका : जिल्हयात अतिवृष्टीमुळे व त्यामुळे सिना नदीला आलेल्या पुराने महावितरण सोलापूर मंडळ अंतर्गत जेऊर, माढा, करम ाळा, मोहोळ, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात नदीकाठावर असलेल्या गावात व शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा करणाऱ्या म हावितरणच्या लघुदाब उच्चदाब व रोहित्र पाण्याखाली गेल्याने संपूर्ण वीज पुरवठा दि.२२.०९.२०२५ पासून पुर्णतः खंडीत होता. बाधित एकूण ९५ गावांपैकी ८८ गावांचा वीज पुरवठा सुरळीत करण्यात म हावितरणला यश आले.

या गांवाना वीज पुरवठा करणाऱ्या ११ केव्ही वाहिन्या यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने बऱ्याच ठिकाणी पर्यायी उपकेंद्र व वाहिनी यांच्या साहाय्याने वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. तरी देखील माढा तालुक्यातील वाकाव, कुंभेज, खैराव व सुलतानपुर तसेच मोहोळ तालुक्यातील रामहिंगणी व मुंढेवाडी ही गावे दि.०२.१०.२०२५ पर्यंत अंधारात होती.

माढा तालुक्यातील वाकाव कुंभेज, खैराव या गावांना मानेगाव उपकेंद्रातून नवीन २२ पोलची ११ केव्ही वाहिनी उभारून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. त्याचप्रम ाणे दारफळ सिना या गावाला बीज पुरवठा करण्याकरीता १२ तासात नवीन रोहित्राची उभारणी करून वीज पुरवठा सुरू करण्यात आला. सु-लतान पुर या गावास बीज पुरवठा करणारी जुनी ११ केव्ही वाहिनी नदीच्या पुरात पुर्णपणे वाहून गेल्याने व नवीन वाहिनी आहे त्या ठिकाणी उभी करण्यासारखी परिस्थिती नसल्याने निमगाव उपकेंद्रातून ४२ पोल ची नवीन ११ केव्ही वाहिनी उभारून वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला.

मोहोळ तालुक्यातील रामहिंगणी व मुंढेवाडी या गावांना वीज पुरवठा करणारी ११ केव्ही वाहिनी नदीच्या पाण्यात असल्याने नवीन १२ पोलची ११ केव्ही वाहिनी व मुंढेवाडी रेल्वे स्टेशन जवळ २०० मीटर ११ केव्ही क्षमतेची भुमीगत केबल टाकून युध्द पातळीवर काम पुर्ण करण्यात आले. तसेच पासलेवाडी गावास देखील नवीन १२ पोलची ११ केव्ही वाहिनी टाकून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

वरीलप्रमाणे काम करत असताना नदीतील गाळ, अर्धवट रस्ते, वाहतूकीस अडथळा व पाऊस इत्यादी अडचणी असताना देखील महावितरणचे कर्मचारी यांनी रात्रंदिवस काम पूर्ण करून वीज पुरवठा सुरळीत केला. या कामी महावितरणचे सोलापूर मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. सुनील माने हे स्वतः जातीने लक्ष ठेवून होते. क्षेत्रीय स्तरावर माढा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री उध्दव जाधव, शाखाधिकारी श्री. शिवम कांबळे व श्री राहूल गायकवाड यांनी विशेष प्रयत्न केले. मोहोळ उपविभागात उपकार्यकारी अभियंता श्री पटवेगर व त्यांचे शाखाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेऊन वीज पुरवठा सुरळीत केला. महावितरण कडून प्रथम गावठाण भाग व पाणीपुरवठा सुरळीत करण्यास प्राधान्य देण्यात आले. शेतीपंप वाहिनींचे काम मोठया प्रमाणात हाती घेण्यात आले असून लवकरात लवकर तोही वीजपुरवठा चालू करण्यास सुरवात होईल, असे म हावितरण कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस जाधव कुटुंबियांकडून दोन चांदीची घागर भेट

पंढरपूर : आज दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी रा. अवली, ता. आटपाडी, जि. सांगली येथील राजाराम गोविंद जाधव यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास चांदीची घागर नग २ भेट स्वरूपात दिल्या. या घागरांचे एकूण वजन १९०० ग्रॅम (१ किलो ९०० ग्रॅम) असून त्याची किंमत रु. २,४६,०००/- इतकी आहे.

या प्रसंगी मंदिर समितीचे सदस्य मा. संभाजी शिंदे यांच्या हस्ते भाविक राज-ाराम गोविंद जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

मंदिर समितीच्या वतीने या उदार दानाबद्दल जाधव कुटुंबियांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

कोढुरे स्वातंत्र्यविर सावरकर विद्यालयालातील विद्यार्थ्यांचे विविध खेळांमध्ये कौतुकास्पद कामगिरी

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी. नाशिक येथे झालेल्या खेळांच्या विविध स्पर्धामध्ये कौतुकास्पद कामगिरी केली असून शालेय जलतरण विभागीय स्पर्धेमध्ये इ.८ वी, अ ,चा विद्यार्थी आदित्य शरद चौभे याने सहभागी होवून ५० मीटर व २०० मीटर फ्रीस्टाइल या मध्ये प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरावर प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला आहे ,असून म ल्हखांब या जिल्हास्तरीय खेळामध्ये ई.९ वी चा विद्यार्थी साई विनोद कुलथे व श्रेयस गोरक्षनाथ आहेर हे विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये साई कुलथे याने मल्लखांबातील लटकता मल्लखांब ,रोप मल्लखांब,पोल मल्लखांब तीनही प्रकारातील स्पर्धेमध्ये त्याने तृतीय क्रमांक मिळविला त्याबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे, संस्थेचे सभापती व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर तालुका संचालक शिवाजी गडाख विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस एल सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी पालक वर्ग.यांनी अभिनंदन केले असून. पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

मनसेच्या वतीने शेतकऱ्यांना मदतीचा हात

पंढरपूर/प्रतिनिधी : सोल-ापूर जिल्ह्यातील पावसाने शेतकऱ्यांच्या पिकावर अनेक प्रकारचे रोग आले आ-हेत त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणे नुकसान झालेले आहे. त्याच्यावर उपाय म्हणून. मनसे नेते श्री दिलीप बापू धोत्रे यांनी सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवनी हे गाव अतिवृष्टी आणि महा-पुरामुळे उध्वस्त झाले आहे. या गावातील शेकडो शेतकऱ्यांना म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीप बापू धोत्रे प्रदेश सरचिटणीस पाणी आणि दूध डॉक्टर मनोज चव्हाण यांच्या हस्ते पिकावरील फवारणीचे विविध औषधे टॉनिक आणि कीटकनाशके देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची सोलापूर जिल्हा अध्यक्ष विनायक महेंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी से-नेचे राज्य उपाध्यक्ष अमोल कुलकर्णी, मनसेचे पंढरपूर तालुका अध्यक्ष शशिकांत पाटील, विधानसभा अध्यक्ष अनिल बागल, वाहतूक से-नेचे हितेंद्र टेंभुर्णीकर, शिवसेनेचे अध्यक्ष ओंकार गुंड, शिक्षक सेनेचे घोडके सर इत्यादी आधी जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्तिकी एकादशीला श्रींची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शासनाचे मार्गदर्शन प्राप्त

पंढरपूर : कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. असा राहणार आहे. कार्तिकी एकादशीला श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची शासकीय महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते करण्याची परंपरा आहे.

तथापि, राज्याच्या मंत्रिमंडळात सध्या दोन

उपमुख्यमंत्री असल्याने कोणत्या मान्यवरांच्या हस्ते पूजा करावी याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यावर आज दि.०६ ऑक्टोंबर रोजी शासनाने लेखी म ार्गदर्शन केले असून, यंदाची कार्तिकी एकादशीची श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची शासकीय महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. त्यानुसार मा. मंत्री महोदयांना मंदिर समि तीच्या वतीने पुजेचे निमंत्रण देण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

कल्याणशेट्टी महाविद्यालयात मराठी अभिजात भाषा दिनानिमित्त कार्यक्रम

प्रा. बापूजी निंबाळकर यांचे प्रतिपादन

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल अभिरुची निर्माण करावी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी ग्रंथ वाचनाकडे दुर्लक्ष करत आहेत. त्याम ुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेतील साहित्याबद्दल कमालीची अनास्था निर्माण झाली आहे. आता मराठी भाषेबद्दल अभिरुची निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर आली आहे. त्यासाठी त्यांनी दर्जेदार अध्यापन केले पाहिजे, विद्यार्थ्यांनी देखील मराठी साहित्याचे वाचन, चिंतन व मनन करून ही भाषा चिरकाल समृद्ध कशी होईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा बापूजी निंबाळकर यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील मराठी वांग्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी अभिजात भाषा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, विभाग प्रमुख भीम सोनकांबळे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मोबाईल, व्हाट्सअप, ट्विटर फेसबुक यांना आधुनिक युगात महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मराठी भाषेकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष झाले आहे इंग्रजी म ाध्यमाच्या शाळा कार्यान्वित झाल्याम ुळे भाषेचा दर्जा खालावला आहे. अशा स्थितीत भाषेची अभिरुची निर्माण करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका शिक्षकांनी बजावली पाहिजे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी ज्ञानेश्वर मुळे, डॉ सदानंद मोरे, डॉ राजन दीक्षित, डॉ लक्ष्मीकांत देशमुख, संजय नहार, प्रा डॉ रंगनाथ पठारे व हरी नरके यांनी मोलाचे योगदान दिले आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले पाहिजे.

नाणेघाट व सोलापूर येथील शिलालेख अभिजात दर्जा मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरले आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे मराठी भाषेतील अभंग अजरामर झाले आहेत तर वि स खांडेकर, वि वा शिरवाडकर, विंदा करंदीकर, भालचंद नेमाडे यांच्या मराठीतील साहित्याला ज्ञानप-ीठ पुरस्कार मिळाला आहे. त्यांची परंपरा अबाधित ठेवण्याची जबाबदारी आता युवकांवर आली आहे हे त्यांना शिक्षकांनी सांगितले पाहिजे.

हत्तरसंग कुडल येथील मराठी भाषेतील शिलालेखाचा अभिमान

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथे मराठी भाषेतील पहिला शिलालेख आहे. जो वाचेल तो विजयी होईल असे त्यावर कोरलेले आहे. शिला-लेखाचे संशोधन स्व आनंद कुंभार यांनी केले आहे. त्या शिलालेखाचा मराठी माणूस म्हणून मला अभिम ान आहे असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, मराठी भाषा प्राचीन असून समृद्ध व संपन्न आहे भाषेची गोडी अवीट आहे. मराठी भाषे-तील अभंग, साहित्य,कथा, कविता रसिक जणांनाच नव्हे तर अबाल वृद्धांना आनंदाची अभिरुची देतात. म्हणूनच मराठी भाषेचे महत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखले व आपल्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्याबद्दल केंद्र सरकारला धन्यवाद दिले पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा ओंकार घीवारे यांनी केले. आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले यशस्वीतेसाठी प्रा सौरभ भस्मे यांनी प्रयत्न केले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रात सुरू होणार रोजगारक्षम अभ्यासक्रमांचा नवा अध्याय

राज्यातील ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना मिळणार नव्या युगातील कौशल्यांचे प्रशिक्षण : कॅबिनेट मंत्री श्री मंगलप्रभात लोढा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे युवकांना उद्योग सुसंगत आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने 'मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती विभागाचे कॅबिनेट मंत्री श्री मंगलप्रभात लोढा यांनी आज मंत्रालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राज्यभरात ६०० ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, या कार्यक्रमांना विश्वकर्मा समाजातील कारागीर, स्थानिक कलाकार व पारंपरिक व्यवसायातील तज्ज्ञ यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले जाईल. या माध्यमातून त्यांच्या योगदानाला सन्मान मिळेल आणि समाजातील पारंपरिक कौशल्यांविषयी आदरभाव वाढेल.

या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण २,५०६ तुकड्या सुरू करण्यात येणार आहेत. या माध्यमातून चालू वर्षात ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार-रक्षम कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार असून, पुढील वर्षापासून ही संख्या १ लाख प्रशिक्षणार्थ्यांपर्यंत वाढविण्याचा संकल्प विभागाने केला आहे. या उपक्रमाद्वारे कौशल्य शिक्षणाचे विकेंद्रीकरण (Decentralisation) करण्यात येत असून, अभ्यासक्रमांची निवड स्थानिक मागणी व जनहिताच्या आवश्यकतेनुसार करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील संस्था व्यवस्थापन समित्या (IMC) स्थानिक पातळीवर हे अभ्यासक्रम चालविणार आहेत. त्यामुळे शिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी आणि गुणवत्ता नियंत्रण या सर्व बाबींमध्ये स्थानिक सहभाग व उत्तरदायित्व वाढणार आहे.

श्री लोढा म्हणाले की, उद्योगांच्या बदलत्या मागणीनुसार राज्यातील युवकांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण देणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे. ग्रामीण भागातील युवक तसेच महिला उमेदवारांना स्थानिक पातळीवर प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे या उपक्रमाची वैशिष्ट्य आहे.

प्रवेश प्रक्रिया आणि पात्रता

या कार्यक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत असून, इच्छुक उमेदवारांनी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. प्रशिक्षण शुल्क प्रति महिना रुपये १,००० ते ५,००० इतके निश्चित करण्यात आले आहे. २५ टक्के जागा संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या असून, उर्वरित जागा बाह्य उमेदवारांसाठी खुल्या असतील. या अभ्यासक्रमांसाठी आयटीआयमधील विद्यमान व उत्तीर्ण विद्यार्थी तसेच दहावी, बारावी, पदविका किंवा पदवी शिक्षण घेत असलेले विद्यार्थी पात्र असतील.

उद्घाटन कार्यक्रमात विश्वकर्मांचा सन्मान

उदयोन्मुख क्षेत्रांतील प्रशिक्षण

या कार्यक्रमांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित अभ्यासक्रमांचा समावेश असून, त्यात ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सोलर ऊर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ग्रीन हायड्रोजन, मोबाईल दुरुस्ती तंत्रज्ञ, सोशल मीडिया प्रभावक (इन्फ्लुएंसर) इत्यादी विषयांचा समावेश आहे.

महिला उमेदवारांसाठी ३६४ विशेष बॅचेस तसेच उदयोन्मुख क्षेत्रांसाठी ४०८ विशेष बॅचेस सुरू करण्यात येणार आहेत. गडचिरोली, लातूर, नागपूर आणि अमरावती येथे स्थानिक उद्योग गरजांनुसार विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार असून, नाशिक येथे होणारा कुंभमेळा लक्षात घेऊन वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट हा विशेष अभ्यासक्रमही राबविण्यात येईल.

श्री लोढा पुढे म्हणाले, कौशल्य प्रशिक्षण ही केवळ रोजगार प्राप्तीचे साधन नाही, तर आत्मनिर्भरतेकडे नेणारी परिवर्तन प्रक्रिया आहे. 'मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' हा उपक्रम महाराष्ट्राच्या कौशल्य क्षेत्रात विकासाचा नवा अध्याय लिहिणारा ठरेल.

अधिक माहितीसाठी :

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

नोंदणी संकेतस्थळ : https://admission.dvet.gov.in

जवळच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा शासकीय तांत्रिक विद्यालयात संपर्क साधावा.

डॉ. आंबेडकरांच्या पुर्णाकृती पुतळ्याची पुतळा पुनर्वसन समितीच्या शिष्टमंडळाने केली पाहणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाची जेजुरी या ठिकाणी असलेला पुतळा रस्ता रुंदणीकरणात पुरंदर तालुका प्रशासनाने १४ जून २०२४ रोजी काढला होता. या पुतळ्याच्या चौथाऱ्याचे काम जेजुरी नगरपरिषद फंडातून जेजुरी येथे सुरु आहे व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे काम पुणे येथे प्रख्यात पुतळा शिल्पकार महेंद्र थोपटे यांच्या स्टुडिओ मध्ये सुरु आहे, या कामाची पाहणी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समितीच्या वतीने रविवार दि. ५ ऑक्टोंबर २०२५ रोजी केली.

यावेळी पुतळा पुनर्वसन समितीचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, उपाध्यक्ष विष्णूदादा भोसले, सचिव तानाजी भालेराव, विश्वस्त सुनिलतात्या धिवार, विश्वस्त सुनिल जगताप, सल्लागार समितीचे आनंदराव घोरपडे गुरुजी सुधीर शेलार गोविंद जगताप यांच्या शिष्टमंडळाने केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे, यावेळी पुतळा पुनर्वसन समितीच्या वतीने शिल्पकार महेंद्र थोपटे यांना पुतळ्या संदर्भात काही सुचना केल्या. पुतळ्याचे काम हे लोकवर्गणीतून करण्यात येणार असून याचा खर्च अंदाजे ३० लक्ष रुपये इतका येणार असुन, पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी १ कोटी ७२ लक्ष रुपये इतका खर्च होणार आहे. हा निधी शासन स्तरावरून करण्यात येणार आहे. यासाठी जेजुरी नगरपरिषदेने शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

सरकारी कामात अडथळा; एकावर गुन्हा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ५ ऑक्टोंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास बाळ ब्रिजवर घडली. याप्रकरणी ज्ञानेश्वर भगवान बिहाडे (नोकरी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ शिवाजीनगर आगार,पुणे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून चार चाकी गाडी क्रमांक एमएच.१३.डीवाय.७४७७ यातील आज्ञा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे शिवशाही बस क्रमांक एम एच.०६.बीडब्लू.०७०२ ही बस घेऊन सोलापूर ते पुणे असे हायवेने जात असताना वरील क्रमांकाच्या कारचालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बसच्या समोर उभी करून फायबर काठी घेऊन शिवीगाळ करत पुढे जाण्यासाठी साईट का दिला नाही, या कारणावरून मारून जखमी करत सरकारी कामात अडथळा आणला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

नवरात्र महोत्सव: कोजागिरी पोर्णिमा: श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस पारंपारिक पोशाखासह सह अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस कोजागिरी पोर्णिमा निमित्त पारंपारिक पोशाखासह सह अलंकार परिधान आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोने मुकुट, मोत्याचा तुरा, नाम, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याची कंठी २ पदरी, मोत्याची कंठी १ पदरी पाचूचा लोलक, शेरपेच १० लोलक असलेला, मस्त्य जोड, तोडे जोडे, लॉकेट १ लक्ष्मी पेंडलसह, मोहरांची माळ, तुळशीची माळ १ पदरी, सूर्यकळ्यांच्या हार, मोहनमाळ ५ पदरी, तांदळ्या हार ७ पदरी इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, मान्य मोत्याच्या पाटल्या जोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, सोन्या मोत्याचा तानवड जोड, मोत्याचे मंगळसूत्र, खड्याची वेणी, तन्मणी मोठा, जडावाचे बाजूबंद जोड, मोत्याचा कंठ, चिंचपेटी हिरवी, बाजीराव गरसोळी, पेट्याची बिंदी, जडावाचा हार, मस्त्य जोड, वाक्या जोड, रूळ जोड, कंबरपट्टा, हायकोल, तारामंडळ इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

कोंढरकी येथे ए.पी.आय. सुरज निंबाळकर यांचा नेहरू युवा मंडळाच्या वतीने सत्कार संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कोंढरकी ग्रामस्थ व नेहरू युवा मंडळाच्या वतीने ए.पी.आय.सुरज निंबाळकर यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना ते आपल्या संपूर्ण जीवनप्रवास सांगितला वडिलांचे आकार निधन झाल्याने घरातील कर्ता पुरुष मीच असल्याकारणाने ई .बारावी नंतर, कष्ट करून कौटुंबिक जबाबदारी संपूर्णपणे सांभाळत त्यांनी यश प्राप्त केले. अनेक संकटांवर मात करीत एम पी एससी अभ्यास करून २०१५ मध्ये पी एस आय पदी निवड झाली सुरूवात गडचिरोली येथे व नंतर सोलापूर येथे गुन्हा शाखेत कर्तव्य बजावत असताना त्यांना पदोन्नती मिळाली असुन मुंबई पोलीस येथे ए पी आय म्हणून झाली आहे. या सर्व यशाचे श्रेय ते कुटुंबातील सर्व सदस्य व मित्रपरिवाम ुळे शक्य झालेले आहे असे सांगितले. तसेच त्यांनी युवा युवती यांना मोलाचे मार्गदर्शन करताना ,विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्न करण्यास सांगितले जिद्द चिकाटीच्या जोरावर कोणती गोष्ट अशक्य नाही असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

नेहरू मंडळाचे राजेंद्र फुगारे बोलताना म्हणाले की कलियुगामध्ये आईची संस्कार चांगले, असेल तर मुल चांगलीच घडतात म्हणूनच आईच्या आशीर्वादाने आपली मित्र सुरज निंबाळकर यांचा प्रवास एपीआय पदापर्यंत पोहोचला

यावेळी नेहरू युवा मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते तसेच गावातील ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील, समाजसेवक राम पाटील, हनुमान पाटील, नवनाथ पाटील, अज्ञान दांडगे, आनंद दांडगे, सागर दांडगे, प्रताप दांडगे, राहुल नागणे,सागर नागणे, मुंबई पोलीस सचिन मांजरे, नितीन दांडगे,विनोद लाटे, दांडगी पाटील परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच कोंढारकी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिवृष्टीग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे - सोलापूर जिल्हा माहेश्वरी सभा व समाजाचा उपक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर प्रतिनिधी/नागेश श्रीचिप्पा : सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी सोलापूर जिल्हा माहेश्वरी सभा आणि समस्त मारवाडी समाज, सोलापूर यांच्या वतीने 'पूरग्रस्तांना मदत अभियान' राबविण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत पूरग्रस्त कुटुंबांना तातडीने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जाणार आहे.

आवश्यक वस्तूंमध्ये ज्वारीचे पीठ, गहू पीठ, तांदूळ, खाद्यतेल, हळद-मसाले, मिठ, मेणबत्त्या, पॅकिंग पिशव्या, साखर, दुध पावडर, प्लास्टिक बादल्या, चादरी, सतरंजी, अंगावरील साबण, मच्छर अगरबत्ती, टॉर्च व बॅटऱ्या, भांडी, पातेले, तवा, चमचा, काडेपेट्या आदी वस्तूंचा समावेश आहे.

सभा व समाजाने केलेले आवाहन आहे की, पूरग्रस्तांना दान नव्हे, तर दिलासा द्या या भावनेतून इच्छुक दात्यांनी वस्तूरूपाने मदत करावी.

या मदत अभियानाची सुरुवात मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वा.बाळीवेस येथून करण्यात आला आहे या अभियानात अध्यक्ष जवाहर जाजु, चंद्रकांत तापडिया, मधुसूदन कालाणी, गोकुळ झंवर, गिरीश जाखोटिया, किरण राठी, प्रविण चंडक, अशोक बाहेती, श्रीकांत लड्ढा, वेणुगोपाल लड्ढा, गोकुळ जाजु, राजगोपाल सोमाणी, रंगनाथ सोमाणी, नारायण कासट, संपत तोष्णीवाल, ओम साबू, ओम दरळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना तातडीने ५० हजार रुपये मदत द्यावी — **शासनाकडे आग्रही मागणी**

ओला दुष्काळ जाहीर करण्याची निफाड तालुका काँग्रेसची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : आपल्या राज्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. बळीराजा अस्मानी संकटामुळे उद्ध्वस्त झालेला आहे. परंतु सरकारने जबाबदारी उचलून शेतकरी बांधवांसाठी व नागरिकांसाठी कुठलीही मदत जाहीर केली नाही. शेतकरी वर्ग संकटात असतांना शेतकऱ्यांना सरकारने वाऱ्यावर सोडलेले आहे.मात्र काँग्रेस पक्ष नेहमी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी, कामगार, कष्टकऱ्यांच्या बाजूने उभा राहिला आहे. आज या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना तातडीने ५० हजार रुपये मदत द्यावी. सरसकट कर्जमाफी करावी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी आग्रही मागणी काँग्रेस पक्षाने शासनाकडे केली आहे. परंतु दुर्दैवाने शासन शेतकऱ्यांकडे व शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहे. शेतकऱ्यांवर प्रचंड असे संकट आलेले असताना सुद्धा केंद्र शासनाचे कोणतेही पथक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आलेले नाही. ही अत्यंत व निषेधार्य बाब आहे. या आग्रही मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशान्वये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायक शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून त्वरीत नुकसान भरपाई मिळाली नाहीतर रस्त्यावर उतरून लढा देण्याचे सांगितले याप्रसंगी कृषितज्ज्ञ सचिन होळकर, शहराध्यक्ष स्वप्नील बिनायकिया युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, भैय्याकाका देशमुख, उपाध्यक्ष अलीभाई शेख, ज्येष्ठ नेते नंदकिशोर कापसे जाफर भाई पठाण, गणेश धोत्रे, युवा शेतकरी गावले यांनी मनोगत व्यक्त करून सरकारचा निषेध केला.

याप्रसंगी उपस्थितांनी ओला दुष्काळ जाहीर करा, सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे, या घोषणांनी तहसील कार्यालयचा परिसर दणाणून सोडला, यावेळी उपविभागीय अधिकारी शशिकांतजी मंगरूळे व तहसीलदार विशालजी नाईकवाडे यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी तालुका सरचिटणीस सुहास सुरळीकर, तालुका उपाध्यक्ष अनिल शिंदे, ज्येष्ठ नेते प्रभाकर हुजबंध, संपत कराड, बाळासाहेब खालकर, युवा तालुका युवा उपाध्यक्ष महेश शिरसाठ, तालुका संघटक मनोज निरभवणे, नाना माळी, बापू शिंदे, सुरेश गोसावी, सोमनाथ खताळे, ज्ञानेश्वर वाघ, निवृती सोनवणे,ओझर युवा शहराध्यक्ष ऋषिकेश सोनवणे, निफाड शहर युवा उपाध्यक्ष अमीन कुरेशी, दुर्योधन गांगुर्डे, सतीश भालेराव, अल्ताब पठाण, फारुक तांबोळी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.